14 DEC 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाऊ पाध्ये काळाच्या चौकटी तोडणारा लेखक

## डॉ. श्रीराम पवार : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

कोल्हापूर, ता. १३ : 'भाऊ पाध्ये काळाच्या चौकटी तोडणारे लेखक होते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मय : आकलन आणि पुनर्विचार' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

पवार म्हणाले, 'या चर्चासत्राच्या निमित्ताने पाध्ये यांच्या लेखनाचे नव्याने पुनर्मूल्यांकन होत आहे. महानगरीय जीवनाचा विस्तृत आलेख पाध्ये यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून आलेला आहे. तसेच पत्रकारितेचे सूक्ष्म निरीक्षण पाध्येंच्या ललित लेखनातून निर्भयपणे आलेले दिसून येते.'



कोल्हापूर : लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. श्रीराम पवार.

समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील म्हणाले, 'भारतीय परंपरेतील श्रेष्ठ साहित्यिक म्हणून पाध्येंचा गौरव केला पाहिजे. ते मुंबईचा भाष्यकार ठरतात. अशा श्रेष्ठ लेखकाकडे समीक्षकांनी म्हणावे तसे लक्ष दिले नाही.'

पहिल्या सत्रामध्ये 'भाऊ पाध्ये यांचे कथा वाङ्मय' यामध्ये आसाराम लोमटे यांनी 'भाऊ पाध्ये यांची कथा आकलन आणि अन्वयार्थ', तर अवधूत डोंगरे यांनी 'भाऊ पाध्ये यांच्या कथेतील धक्कातंत्र' यावर मांडणी केली. या सत्राच्या अध्यक्ष डॉ. माया पंडित-नारकर होत्या. 'भाऊ पाध्ये यांचे कादंबरी वाङ्मय' या दुसऱ्या सत्रामध्ये शितल पावसकर यांनी 'भाऊ पाध्ये यांच्या कादंबरीतील स्त्री चित्रण' आणि दत्ता घोलप यांनी 'भाऊ पाध्ये यांची कादंबरी आविष्कार विशेष' याविषयी मांडणी केली. तिसऱ्या सत्रामध्ये 'भाऊ पाध्ये यांचे निवडक वाङ्मय' यावर ओंकार थोरात यांनी पाध्ये यांच्या कथेचे अभिवाचन केले. 'भाऊ पाध्ये : स्तंभलेखन, चित्रपटविषयक आणि अन्य लेखन' या चौथ्या सत्रामध्ये प्रसाद कुमठेकर यांनी 'भाऊ पाध्ये यांचे चित्रपटविषयक लेखन' यावर तसेच गोरख थोरात यांनी 'राडा कादंबरीचे भाषांतर', सचिन परब यांनी 'पत्रकार भाऊ पाध्ये' या अनुषंगाने मांडणी केली. या सत्राचे अध्यक्ष डॉ. डॉ. श्रीराम पवार होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी चर्चासत्राचा आढावा घेतला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

14 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाऊ पाध्ये अनुभववादी साहित्यिक

## प्रा. अविनाश सप्रे यांचे प्रतिपादन : विद्यापीठात चर्चासत्राचे आयोजन

**जनप्रवास** : कोल्हापूर

भाऊ पाध्ये हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे अनुभववादी, मानवतावादी लेखक होते. समस्त प्रस्थापित मांडणी व संकेतांना छेद देणारे आणि प्रस्थापित चौकटी झुगारून देत जगण्याचे अराजक मांडणारे लेखन हे त्यांच्या समग्र साहित्य व्यवहाराचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे पी. एम. उषा योजनेंतर्गत साठोत्तरी काळातील अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मयःआकलन आणि पुनर्विचार' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भाऊ पाध्ये यांच्या 'राडा' या कादंबरीच्या हिंदी अनुवादाचे प्रकाशन करताना डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. अविनाश सप्रे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, गोरख थोरात, चंद्रकांत पाटील, डॉ. रणधीर शिंदे.**

समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

प्रा. सप्रे म्हणाले, भाऊ पाध्ये यांचे साहित्य समजून घेण्यास प्रचलित वादसंकल्पना अपुऱ्या ठरतात. रचनेपेक्षा विरचनेवर अधिक भर दिला. एका विशिष्ट तटस्थ बिंदूवरुन ते त्याविषयीचे लेखन करतात. त्यांच्या लेखनात कोणताही पूर्वग्रह आढळत नाही.

अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे म्हणाले, भाऊ पाध्ये यांनी उघड्या डोळ्यांनी, संवेदनशील मनाने भोवताल टिपला आणि तो जसाच्या तसा लिहिला म्हणून ते लेखन वाचकांना भिडले. यावेळी दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवड झाल्याबद्दल प्रा. अविनाश सप्रे यांचा आणि डॉ. राजेश पाटील यांचा सत्कार केला. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. माया पंडित, डॉ. उदय नारकर, डॉ. श्रीराम पवार, सचिन परब, डॉ. शरद नावरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. किरण गुरव, अमित नारकर, अवधूत डोंगरे, प्रसाद कुमठेकर होते.

### जन्मशताब्दीनिमित्त आयोजित चर्चासत्राची सांगता

भाऊ पाध्ये काळाच्या चौकटी तोडणारा लेखक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार यांनी केले. शिवाज विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित साठोत्तरी काळातील अग्रगण्ये लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त चर्चासत्रात ते बोलत होते. 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मयः आकलन आणि पुनर्विचार' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानावरून डॉ. माया पंडित-नारकर यांनी भाऊ पाध्ये यांच्या कथेविषयी मांडणी केली. शीतल पावसकर यांनी 'भाऊ पाध्ये यांच्या कादंबरीतील स्त्रीचित्रण' आणि दत्ता घोलप यांनी "भाऊ पाध्ये यांची कादंबरी अविष्कार विशेष' याविषयी मांडणी केली. गोरख थोरात यांनी 'राडा कादंबरीचे भाषांतर' या अनुषंगाने मांडणी केली. सचिन परब यांनी 'पत्रकार भाऊ पाध्ये' या अनुषंगाने मांडणी केली. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तावित विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.